राज्योन्नती

# मोरगाव येथे सायबर गुन्ह्यांनविषयी मार्गदर्शन

**प्रतिनिधी/ २६ ऑक्टोबर**

**मोरगांव (भाकरे):** दि.स्थानिक ग्रामपंचायत कार्यालयामध्ये सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा या उपक्रमाअंतर्गत सायबर गुन्हे म्हणजे काय आणि हे गुन्हे होऊ नये म्हणून कोणती काळजी घ्यावी याविषयी मार्गदर्शन संपन्न झाले. हा उपक्रम शंकरलाल खंडेलवाल महाविद्यालय अकोला यांनी क्विक हील फाउंडेशन पुणे आणि महाराष्ट्र सायबर यांच्या सहयोगाने आयोजित केला होता. यावेळी समन्वयक डॉ. हरिदास खरात, सायबर वॉरियर्स अभिषेक बाजड, सार्थक ठाकरे, अभय सुरडकर, निशांत आगरकर यांनी ग्रामस्थांना ओटिपी, फेक मेसेज, फेक बँक कॉल्स, ई के वाय सी, पीक विमा, शेतकऱ्यांशी संबंधित विविध पद्धतीने कशी ऑनलाईन फसवणूक होते आणि यापासून आपण कसे सुरक्षित राहावे याविषयी सविस्तर



माहिती सांगितली. मोबाईल आणि इंटरनेटचा वापर करतांना कोणती काळजी घ्यावी या विषयी मार्गदर्शन केले आणि आवश्यक तेव्हढाच वापर करण्यासाठी शपथ देण्यात आली. यावेळी ग्रामपंचायत सरपंच उमा ज्ञानेश्वर माळी, उपसरपंच, प्रतिष्ठित नागरिक आणि ग्रामस्थ उपस्थित होते.

लोकमत

# ायबर सुरक्षिततेबाबत कार्यशाळा संपन्न

**ाळा :** संत गाडगे महाराज कनिष्ठ ाविद्यालय येथे नुकतीच सायबर क्षिततेबाबत कार्यशाळा कार्यक्रम न्न झाली.

अकोला येथील शंकरलाल डेलवाल महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. ादीश साबू, भौतिकशास्त्र विभागाचे हरिदास खरात यांच्या र्गदर्शनाखाली सुमित संजय ाकाळ व अनिकेत भुडके या ार्थ्यांनी सायबर सुरक्षिततेबाबत नलाइन फसवणूक, वाढता सोशल डियाचा वापर, त्यामधून होणारी



फसवणूक या विषयावर मार्गदर्शन केले. अध्यक्षस्थानी मुख्याध्यापक सरकटे होते. क्विक हिल फाउंडेशन पुणे आणि महाराष्ट्र सायबर सेल मुंबई यांच्या सहयोगाने कार्यक्रम पार पडला. याप्रसंगी शिक्षक गावंडे, भाकरे, ब्राह्मणे, रेखाते, डॉ. विजेंद्र तायडे व विद्यार्थी, कर्मचारी आदी उपस्थित होते.

Hello Akola Gramin
Page No. 2 Oct 31, 2023
Powered by: erelego.com

# सायबर शिक्षा रॅलीतून विद्यार्थ्यांनी केली सुरक्षिततेची जनजागृती!



**सोलापूर :** पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, नागेश करजगी ऑर्किड स्कूल व क्विक हिल फॉउंडेशन, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा रॅलीचे आयोजन करण्यात आले. या रॅलीमध्ये नागेश करजगी ऑर्किड स्कूलचे २०० व विद्यापीठातील संगणकशास्त्र संकुलाचे ५० विद्यार्थी सहभागी झाले होते.

या रॅलीचे उद्घाटन नागेश करजगी ऑर्किड स्कूलचे चेअरमन डॉ. कुमार करजगी व संगणकशास्त्र संकुलाचे संचालक प्रा. डॉ. व्ही. बी. घुटे यांनी हिरवा झेंडा दाखवून केला. रॅलीचा मार्ग ऑर्किड स्कूल – सुपर मार्केट – उमा नगरी असा होता. शेवटी शाळेजवळ रॅलीचे विसर्जन झाले. रॅलीच्या सुरुवातीला सर्वांनी सुरक्षिततेची शपथ घेतली.

सध्याच्या ऑनलाईन युगात होणारे सायबर गुन्हे टाळण्यासाठी घ्यावयाची काळजी, सोशल मीडियावर काम करत असताना घ्यावयाची काळजी, मोबाइलवर ॲप इन्स्टॉल करताना कोणते सेटिंग करावे अश्या विविध विषयावर रॅलीद्वारे माहिती देऊन समाजामध्ये जागरूकता निर्माण करण्याचा प्रयत्न करण्यात आला.

रॅलीचे आयोजन करण्यासाठी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. प्रकाश महानवार व कुलसचिव योगिनी घारे यांचे विशेष मार्गदर्शन लाभले. तसेच प्राचार्य रुपाली हजारे, क्विक हिल फॉउंडेशनचे अजय शिर्के, सुगंधा दानी व गायत्री पवार यांनी सहकार्य केले. नागेश करजगी ऑर्किड स्कूलचे व्यवस्थापक अक्षय चिडगुप्पी, सचिव वर्षा विभुते, व सौ. अन्नपूर्णा अनगोन्डा आदी रॅलीमध्ये सामील झाले होते.

संकुलातील डॉ. आर. एस. मेंते, डॉ. ए. आर. शिंदे, डॉ. जे. डी. माशाळे, डॉ. एस. डी. राऊत, श्री. सी. जी. गाढी, श्री. ज्ञानेश्वर निंबाळकर, संदीप पोटे, विद्यार्थी स्वयंसेवक व नागेश करजगी ऑर्किड स्कूलचे शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी रॅली यशस्वी करण्यासाठी विशेष परिश्रम घेतले. रॅलीच्या उद्घाटन प्रसंगी प्रियांका चव्हाण हिने सूत्रसंचालन केले. रॅलीचा समारोप चरिता जवळकोटी हिच्या आभार प्रदर्शनाने झाला.